आपण हा लेख www.maanavta.com या अध्यात्मिक वेबसाईट वर वाचत आहात.

संपादकीय

कुठे दाणा कच्चा तर नाही ?

लेखक – श्री. राम कुमार 'सेवक' जी मुख्य संपादक – www.maanavta.com

घरात गृहिणी शिजवण्यासाठी ठेवलेली भाजी, शिजली अथवा नाही हे बघण्यासाठी त्या भांडयातील एखाद्या दाण्याचे परीक्षण करतात. जर घेतलेला दाणा (अन्नकण) शिजलेला असेल तर समजतात भाजी पूर्णत: शिजलेली आहे, अन्यथा तो दाणा कच्चा असेल तर समजतात अजुन भाजी शिजवावी लागेल.

काल संध्याकाळची घटना आहे, रस्ता नवीनच बनवलेला होता. त्या ठिकाणी एका बाजूला उभे राहून बघीतल तर रस्ता कुठे कमी रूंद तर कुठे जास्त ''हा रस्ता सारखा रूंद का नाही'' हे विचारल्यावर, माहिती मिळाली की, रस्त्याच्या दोन्ही कडेला मोटार गाडया उभ्या केलेल्या असतात. जेथे गाडया उभ्या होत्या, त्या ठिकाणी रस्त्याची रूंदी कमी झालीय, तर ज्या ठिकाणी गाडया उभ्या नव्हत्या त्या ठिकाणी रस्त्याची रूंदी ठीक होती.

रस्त्याच्याकडेला उभ्या केलेल्या मोटारगाडया सरकारी नव्हत्या तर त्या होत्या त्याच गल्लीतील रहिवाशांच्या, आणि बऱ्याच वेळा माणसं रस्त्याच्या कडेला गाडी उभी करण्याला आपल्या बडेजाव (श्रीमंती)पणाचं लक्षण बनवुन घेतात, त्याकरीता त्या गाडया तेथून बाजुला करणार कोण?

रस्ता तयार होवो अथवा न होवो कुणाच काय बिघडतय? रस्ता तर ठेकेदाराने ने बनवायचा आहे. अरूंद रस्ता बनवीला गेला तर, त्याचाच फायदा होईल, त्याचे बांधकामाच साहित्यही वाचेल आणि मजुरी ही.

उंच, सखल रस्त्यावर माणसे पडली तर पडली, त्यामुळे कुणाला काय फरक?

''आपल काय बिघडतयं'' या विचारधारेला संकुचीत विचारधारा म्हणावं लागले, तर सार्वजनिक हिताच्या दृष्टीने रस्ता रूंद आणि समतल असावा, ही विशाल विचारधारा आहे. विशाल विचारधारेवर संकुचित विचारधारा डोईजड अथवा वरचड आहे, त्याच कारणास्तव रस्ता कुठे रूंद तर कुठे अरूंद आहे.

याद्वारे असे स्पष्ट होते की, येथे नागरीकांच्या कर्तव्याच्या जाणिवेचा दाणा कच्चा आहे.

सरकारला जर शिवीगाळ सुरू केली तर यासाठी प्रत्येक व्यक्ती पुढे येईल, पण व्यक्तीगत हितापेक्षा सामुहिक हितास प्राधान्य देण्याची बाब त्याच्या लक्षात येत नाही, हे ज्ञान त्याला कोण शिकवणार? संकुचीत भावनेच्या जागेवर विशालेतेचा भाव कसा निर्माण होणार?

स्पष्ट आहे की, नागरिकांप्रती (व्यक्तीगत) कर्तव्याची जाणीव नाही. आणी जर जाणीव असेल तर व्यवहारात उपयोगात आणली जात नाही. या परिस्थितीत कुठलेही सरकार कुणाचेही भले करू शकत नाही, कारण दाना कच्चाच आहे.

♣ ♣ ♣ ♣ ♣ ♣ ♣

काल संध्याकाळी पत्नीसोबत भाजीपाला घेण्यासाठी जाण्याचा योग आला. तेथे एका व्यक्तीने तीन कांदे घेतले आणी भाजी विक्रेत्यास विनंती केली की, तीन रूपयाचे कांदे द्यावेत, त्या विक्रेत्याने रागात सांगीतले की, पाच रूपयापेक्षा कमी किंमतीत कांदे मिळणार नाहीत, ''येवुन जातात न जाणो कुठून तरी''

मी त्या व्यक्तीच्या करूण परिस्थितीविषयी विचार करत होतो, ज्याच्याकडे फक्त तीन रूपये आहेत, आणी भाजीच्या प्रेमात तो कांदा खाण्यास इच्छुक होता. (बरच लोक तर कांदासोबतच जेवण करून घेतात, परिस्थितीवश) तोच कांदा त्यांच्यासाठी ''मुर्ग–मुस्सलम'' सुध्दा आहे आणि ''मटर–पनीर'' सुध्दा, तरी सुध्दा भाजी विक्रेता त्याला कांदा देण्यास नकार देत होता, कारण त्याचा फायदा कमी होईल.

विचारणीय बाब हीच आहे की, फायदाच सर्वकाही नाही? जास्त लाभ कुणा श्रीमंत ग्राहकाकडुन कमवुन घे.

भाजी विक्रेता ही गरीबांच्या श्रेणीतच येतो तो कुणी लक्ष्मीपती (श्रीमंत) नाही, परंतू त्या गरजवंतासाठी, हा गरीब ही, कठोर लक्ष्मीपतीसारखा व्यवहार करीत होता.

श्रीमंतांना शिवीगाळ करण्यामध्ये अग्रस्थानी असलेले गरीब सुध्दा गरीबांच्या प्रती दयाळु नाहीत, हेच येथे स्पष्ट होते. गरीबांच्या मनात सुध्दा गरीबांच्या प्रती दया नाही, म्हणजेच मनात दयाभावनेचा दाणा कच्चा आहे.

प्रत्येक व्यक्ती चांगले (भले) करण्याच काम भगवंतावरच सोपवतो, पण परमात्माने तर सर्वांचं भलेच केलं आहे. ऊन–सावली, अन्न–पाणी, जमिन–आकाश, निसर्ग हे सर्व काही भगवंताने सर्वांच्या भल्यासाठीच निर्माण केले आहे. मानवाचा अहिताकरीता काहीच निर्माण केले नाही, परंतु मनुष्य मनुष्याचं भले करणं केव्हा शिकेल?

स्पष्ट आहे की, मानवतेच्या दृष्टाने मानव कच्चा दाणा आहे.

♣ ♣ ♣ ♣ ♣ ♣ ♣

निवडणुका झाल्या, मतमोजणी झाली, एका पक्षास त्यांच्या अपेक्षेपेक्षा जास्त जागा मिळाल्या, नेतागण आनंदी, कार्यकर्ते बेधुंद, शहरातील चौकात तोड–फोड चालु, बाजारहाट बंद.

माझ्या मित्रास कुण्या ओळखीच्या पत्रकाराने फोन केला, ''कुठे आहे भाऊ?'' म्हणाले की, ''दुकानातच बसलोय''

पत्रकाराने सजग केले की, अमुक पक्षाचे कार्यकर्ते तमुक चौकात तोड–फोड करीत आहे, त्याकरीता दुकान बंद कर आणी घर जा.

मित्र विचार करीत होता की, हा तर एक नमुना आहे, पुढील पाच वर्षात कुठे–कुठे आणी कसे–कसे आकांत–तांडव होईल कोण जाणे?

मी या विषयावर एका प्राचार्यांशी बोललो, प्राचार्य महोदय सांगायला लागले की, या विषयावर चर्चा व्हावयास हवी.

मला वाटले की, ही फक्त आहे वायफळ चर्चा – फक्त बुध्दी विलास.

हे अडचणीचे (समस्येचे) योग्य निवारण नाही, निवारण व्यवहारिकतेच्या कसोटीवर व्हावयास हवे. राजकीय पक्षाचे कार्यकर्ते घोषणा देण्यासाठी तर कुशल आहेत, त्यांना रचनात्मक समाजसेवा कोण शिकवणार? शुध्द नितीमत्तेच 'बी' त्यांच्या मनात कोण रूजवणार? हा एक जठील प्रश्न आहे पण त्यावर लक्ष देण्यासाठी कुणाकडेच वेळ नाही. सरकारचे वस्त्र–हरण करण्यासाठी एक शोधला तर हजार भेटतील. मला कुण्या सरकाराविषयी आत्मीयता नाही, परंतु मी अराजकतेच्या भुमीकेशी ही सहमत नाही.

माझा पाठकवर्ग विचार करत असलें की, मी आज कुठल्या विचारचक्रात अडकलोय.

अध्यात्माच्या ठिकाणी या कुठल्या विषयात मी गुंतलोय

या विषयी मला मात्र इतकेच सांगावेसे वाटते की, जर ''अध्यात्म'' या प्रश्नाचे उकल करण्याजेवजी त्यापासुन चार हात लांबच राहु लागले तर ते ''अध्यात्म'' जनमानसाचे नसुन, कुणा वनाचे, कुणा आश्रमाचे, कुणा पर्वताचे वा कुणा गुहेचं अध्यात्म असेल.

आमचे अध्यात्म तर '''मानवतेच'' अध्यात्म आहे आणि वरील तिन्ही प्रश्न मानवी जिवनाशी निगडीत आहेत. जो कुणी मित्र या प्रश्नांची उत्तरे देण्यास अध्यात्मास अक्षम समजतात, त्यांचा भ्रम आहे की, अध्यात्माचा दाणा कच्चा आहे.

सत्यता तर ही आहे की, जे ''अध्यात्म'' ब्रम्हज्ञानाच्या मजबुत पायाभरणी वर निर्माण झाले आहे, त्या जवळ प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आहे आणि तेच योग्य दिशा देण्यास सक्षम आहे. मानवतेस परिपक्वता तेच देऊ शकतात, अर्थात हे अध्यात्मच कच्या दाण्यांना परीपक्व बणवणार; सर्वांचे भले करू शकरणार.

राम कुमार 'सेवक'
rksewak@yahoo.co.in

अनुवादक
सुकदेव पाटील
sukdeo_behere@yahoo.co.in